Vol 5 Issue 8 May 2016

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 8 | May - 2016

Review Of Research






# मराठी प्रथम भाषा अभ्यासक्रमातील स्त्रीवादी कविता – एक विश्लेषण

देविदास कचरू तारू[1] , चंद्रकांत राघो बाविस्कर[2]
[1]संशोधक विदयार्थी , शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड .
[2]मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक व संचालक शिक्षणशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड .

**सारांश**

मराठी प्रथम भाषा अभ्यासक्रमातील कविता हे एक अविभाज्य अंग असून त्याद्वारे संतवाणी निसर्ग देशभक्ती इत्यादी विषयांना स्पर्श करता येतो.

अभंगातून, लावणीतून, कवितेतून, चारोळीतून, कबिराच्या दोहयातून, भारूडाच्याकिंबहुना दीर्घ कवितेतून, नाटय छेटेतून, आई, पत्नी, सून, मुलगी, स्त्री, सासू यांचे वर्णन आपणास ऐकावयास किंवा वाचावयास मिळते. परंतु मराठी पाठयपुस्तकातील कविता वास्तववादी विषयांनाहात घालतात का? याचे परिक्षण करून विश्लेषण करण्यात आलेले आहे. दस्तऐवज संशोधन पध्दतीचा वापरकरून इयत्ता १ ली ते १० वी च्या मराठी पाठयपुस्तकातील कवितांचे स्त्रीवादी दृष्टीकोणातून विश्लेषणकेलेले असून स्त्रीवादी कवयित्री व स्त्री कवितांची संख्या अत्यल्प आहे. कवीच्या तुलनेत कवयित्रीचे प्रमाणही कमी आहे. सध्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात येत असून महिला सबलीकरणासाठी पुरक असणा-या ज्वलंत आणि प्रेरक कविता शोधुन किंबहुना त्याची निर्मिती करून अभ्यासक्रमात समावेश करण्यात यावा.

**प्रमुख शब्द:**–मराठी प्रथम भाषा,अभ्यासक्रम, स्त्रीवादी, विश्लेषण.

## प्रस्तावना :

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा – २००५ नुसार अभ्यासक्रमामध्ये मुलींच्या संदर्भात वागणूकीमधीलसमानता हा औपचारीक दृष्टीकोण ठेवण्यात आला होता. यामध्ये समानसंधी, किंवा समान प्रतिनिधीत्व यातून समान फलनिष्पती अपेक्षित होती. आणि त्याच धरतीवर राज्य आभ्यासक्रम आराखडा – २०१२ हा महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात येवून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.

अशा प्रकारच्या अभ्यासक्रम आराखडयाची विशिष्ट कालखंडानंतर पुनर्रचना करणे अपरिहार्य असते. याचे प्रमुख कारण म्हणजे देश व राज्याच्या प्रगतीसाठी विशिष्ट कालखंडामध्ये ध्येय व उद्दिष्टये निश्चित होतात. आणि हे ध्येय व उदिष्टांच्या पूर्तीसाठी शिक्षण महत्व पुर्ण भूमिका बजावते म्हणुन वेळोवेळी अभ्यासक्रमांमध्ये निश्चित केलेली ध्येय व उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी अभ्यासक्रमात बदल घडून येणे आवश्यक असते.

भारतामध्ये महिला सबलिकरणाची मोहिम मोठया प्रमाणात हाती घेण्यात आलेली आहे. यामुळे आज स्त्रीयांना पुरूषांच्या

बरोबरीने काम करण्याची संधी मिळाली आहे ती आज प्रशासनात जिल्हाधिकारी, एस.पी., सचिव, परराष्ट्र सचिव तथा आरराष्ट्रीय स्तरावर तसचे अंतराळात सुध्दा आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. एवढे होवून सुध्दा बहुसंख्येने महिलांचे सबलिकरण होणे आवश्यक आहे. आणि याचाच एक भाग म्हणून अभ्यासक्रमांमध्ये स्त्री विषयी घटक व कवियात्रीयांना समान घटक प्रतिनिधीत्व देण्यात आले की नाही? याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

कविता ही थेट लाहनांपासून पौढांपर्यंत –हदयाला भीडते ते लहानपणापासून ते मोठयापर्यंत सर्वांना एकत्र बाधते, कविता मनाचा ठाव घेते. ती विचारांच्या पलिकडचा वेध घेते. स्त्रीपुरूष व विदयार्थ्यांत चैतन्यता आणते. कवितेचा थेट समाज मनावर खोलवर परिणाम होतो.अनेक कवींनी स्त्रीच्या विविध भूमिकांवर कविता केल्या आहेत. म्हणून कविता ही समाज प्रबोधनाचे प्रमुख साधन आहे. कवितेच्या माध्यमातून कुप्रथांवर प्रभावीपणे अघात करता येणे शक्य आहे. देशाच्या प्रगतीला हुडाबळी, स्त्रीभ्रुण हत्या, बलात्कार, कौठुबिक हिंसाचार, स्त्रीयांच्या आरोग्य संदर्भातील साधने, बालविवाह पध्दती, स्त्रीसंबधातील अंधश्रधा इत्यादी कुप्रथांचा स्त्रीयांच्या किंबहुना देशाच्या प्रगतीला मारक टरत आहेत. तसेच स्त्रीकर्तृवाची ओळख कवितेच्या माध्यमातून करून देता येते.

सदर संशोधनाद्वारे स्त्रीवादी कविता व कवयिंत्रींची संख्या यांचा अभ्यासक्रम निर्मिती करतांना कितपत विचार करण्यात आलेला आहे. याचा अभ्यास व त्याचे विश्लेषण करणे आवश्क होते. म्हणून सदरील संशोधन हाती घेण्यात आलेले आहेः

१) मराठी प्रथम भाषा अभ्यासक्रमातील स्त्रीवादी कवितांचा शोध घेणे
२) मराठी प्रथम भाषा अभ्यासक्रमातील स्त्री कवयित्रींना स्त्रीवादी लिहलेल्या कवितांचे विश्लेषण
करणे.
३) मराठी प्रथम भाषा अभ्यासक्रमातील स्त्रीवादी कवितांचे विश्लेषण करणे.
४) मराठी प्रथम भाषा अभ्यासक्रमातील स्त्रीवादी कविता या संदर्भांत शिफारस करणे.
५) मराठी प्रथम भाषा अभ्यासक्रमातील स्त्रीवादी कविता संदर्भांत शिफारस करणे.

### *व्याप्ती व मर्यादा :*

या संशोधनासाठी महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, पुणे व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी निर्मित केलेल्या मराठी भाषा पाठयपुस्तकातील कवितांपुरते संबंधित आहे. इयत्ता १ ली ते १० वी च्या मराठी प्रथम भाषा पाठयपुस्तकातील कवितांपैकी स्त्रीवादी किंवा स्त्रीसंबंधि कवितांनपुरतेच मर्यादीत आहे.

### *संशोधन पध्दती*

सदरील संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी दस्तऐवज संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.या संशोधनाची जनसंख्या इयत्ता पहिली ते दहावीच्या पाठयपुस्तकातील १०१ कविता असून त्यापैकी १३ स्त्रीवादी कवयिंत्री या संशोधनाचा नमूना आहेत. महाराष्ट्रराज्य पाठयपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, पुणे यांनी तयार केलेले इयत्ता ०१ ली ते ०८ वीची मराठी प्रथम भाषेची पाठयपुस्तके व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी निर्मित केलेली इयत्ता ०९ वी व १० वीची मराठी भाषेची पाठयपुस्तके ही या संशोधनाची साधने असून शेकडेवारी, आलेख व प्रमाण या संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर संशोधनातील माहितीचे विश्लेषण करण्यासाठी केला आहे.

### *माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन*

*कोष्टक क्रमांक 01 : स्त्रीवादी कविता*

| अ.क्र. | इयत्ता | एकूण कविता | स्त्रीयांसबंधि कवितांची संख्या | शेकडेवारी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०१ली | ०९ | निरंक | निरंक |
| ०२ | ०२री | १० | निरंक | निरंक |
| ०३ | ०३री | १० | ०१ | १०% |
| ०४ | ०४थी | ०९ | ०१ | ११% |
| ०५ | ०५वी | ०८ | ०० | ००% |
| ०६ | ०६वी | ०९ | ०२ | २२% |
| ०७ | ०७वी | ०९ | ०१ | ११% |
| ०८ | ०८वी | १३ | ०२ | १५% |
| ०९ | ०९वी | १४ | ०४ | २९% |
| १० | १०वी | १० | ०२ | २०% |

*निरीक्षण व अर्थनिर्वचन :–*

कोष्टक क्रमांक १ वरून असे निदर्शनास येते की, इयत्ता १ ली ते १० वी च्या पाठयपुस्तकात एकूण १०१ मराठी कवितांचा समावेश आहे. यापैकी इयत्ता १ ली, २ री व ५वी मध्ये असलेल्या पाठयपुस्तकांमध्ये एकही स्त्रीवादी कविता समाविष्ठ करण्यात आलेली नाही.

इयत्ता ६ वी च्या मराठी पाठयपुस्तकांत २६ः , २२ः कविता, इयत्ता ६ वी २०ः कविता, इयत्ता ३ री मध्ये १०ः कविता, इयत्ता ८वी ११ः कविता, इयत्ता ४ थी, ७ वी व इयत्ता ३री मध्ये १०ः कविता या स्त्रीवादी कविता आहेत.

यावरून इयत्ता ६ वी मधील स्त्रीवादी कवितेचे प्रमाण सर्वात जास्त असून १ ली, २ री, ५ वी मध्ये एकही स्त्रीवादी कवितेचा समावेश नाही.

**कोष्टक क्र. 2 स्त्रीवादी कविता व कवयित्री**

| अ.क्र. | इयत्ता | एकूण कवयित्रींची संख्या | स्त्रीयांवर लिहलेल्या कवितांची संख्या | शेकडेवारी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०१ली इयत्ता | ०२ | ०० | ००% |
| ०२ | ०२री इयत्ता | ०४ | ०० | ००% |
| ०३ | ०३री इयत्ता | ०१ | ०० | ००% |
| ०४ | ०४थी इयत्ता | ०३ | ०० | ००% |
| ०५ | ०५वी इयत्ता | ०१ | ०० | ००% |
| ०६ | ०६वी इयत्ता | ०१ | ०१ | १००% |
| ०७ | ०७वी इयत्ता | ०२ | ०० | ००% |
| ०८ | ०८वी इयत्ता | ०३ | ०१ | ३३% |
| ०९ | ०९वी इयत्ता | ०३ | ०१ | ३३% |
| १० | १०वी इयत्ता | ०३ | ०१ | ३३% |

*निरीक्षण व अर्थनिर्वचन :–* कोष्टक क्रमांक २ वरून असे निदर्शनास येते की, इयत्ता १ ली ते १० वी च्या पाठयपुस्तकात कवयित्रीनींलिहिलेल्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे. इयत्ता १ ली, २ री, ३ री, ५ वी व ७ वी च्या पाठयपुस्तकात कवयित्रींचा समावेश आहे. परंतुयात एकही स्त्रीवादी कवितेचा समावेश नाही. तर इयत्ता ०६वी, ८वी, ५वी, १० वी मध्ये प्रत्येक एक कविता ही स्त्रीवादी कविता आहे.

**कोष्टक क्र. 3पुरूष व स्त्रीकवयित्रींचे प्रमाण**

| अ.क्र. | इयत्ता | एकूण कविता | स्त्री कवयित्रीची संख्या | पुरूष कवींची संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०१ इयत्ता | ०९ | ०२ | ०७ |
| ०२ | ०२ इयत्ता | १० | ०४ | ०६ |
| ०३ | ०३ इयत्ता | १० | ०१ | ०९ |
| ०४ | ०४ इयत्ता | ०९ | ०३ | ०६ |
| ०५ | ०५ इयत्ता | ०८ | ०१ | ०७ |
| ०६ | ०६ इयत्ता | ०९ | ०१ | ०८ |
| ०७ | ०७ इयत्ता | ०९ | ०२ | ०७ |
| ०८ | ०८ इयत्ता | १३ | ०३ | १० |
| ०९ | ०९ इयत्ता | १४ | ०३ | ११ |
| १० | १० इयत्ता | १० | ०३ | ०७ |

कोष्टक क्र. ३ वरून असे निदर्शनास येते की, इयत्ता १ ली ते १० वी मध्ये एकूण १०१ कवितांचा समावेश असून त्यापैकी २३ कविता या कवयित्रीनी लिहिलेल्या असून उर्वरीत ७८ कविता हया कवीनी लिहिलेल्या आहेत. कवी व कवयिची लिहिलेल्या असून उर्वरीत ७८ कविता हया कवीनी लिहिलेल्या आहेत. कवी व कवयित्रीचे प्रमाणे २ः८ असे आहे. यावरून कवींच्या तुलनेत कवयित्रींचे प्रमाण अत्यल्प आहे.

**कोष्टक क्र. 4 स्त्री कवितेचे विश्लेषण**

| अ.क्र. | इयत्ता | एकूण कविता | स्त्रीयांविषयी कवितेचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | ०१ इयत्ता | ०९ | निरंक |
| ०२ | ०२ इयत्ता | १० | निरंक |
| ०३ | ०३ इयत्ता | १० | रानवेडी (तुकाराम धांडे) – मुली |
| ०४ | ०४ इयत्ता | ०९ | हे कोण गे आई (भा.रा. तांबे) – आई |
| ०५ | ०५ इयत्ता | ०८ | निरंक |
| ०६ | ०६ इयत्ता | ०९ | १. हिम्मत दया थोडी (अशोक कोळी) – मुली<br>२. निरोप (पद्मा गोळे) – आई |
| ०७ | ०७ इयत्ता | ०९ | आई (यशवंत) – आई |
| ०८ | ०८ इयत्ता | १३ | १. माय (वामन निंबाळकर) – आई<br>२. पंचारती (इंदिरा संत) – स्त्री कर्तृत्व |
| ०९ | ०९ इयत्ता | १४ | १. जोडी आमची सोबता (महेश केळुसकर) पती–पत्नी<br>२. रापी (आनंद गायकवाड) – मुली<br>३. सरण (प्रज्ञा पवार) स्त्री दुःख चित्रण<br>४. बाया पाण्याशीच बोलतात (अजय कांडर) – स्त्री दुःख चित्रण |
| १० | १० इयत्ता | १० | १. दूरस्त मातेस (माधव जुलियन) – आई<br>२. आश्वासक चित्र (नीरजा) – कर्तृत्व |

वरील कोष्टक क्र. ०४ वरून असे निदर्शनास येते की, इयत्ता ३ री, ४थी व ६वी ते १० वी मराठी भाषा पाठयपुस्तकात स्त्रीवादी कवितांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांची एकूण संख्या १३ असून त्यापैकी ३६ः कविता आईशी निगडीत असून प्रत्येकी २३ः कविता हया मुलीविषयक व स्त्री दुःख चित्रणासंबंधी आहे. तर १५ः हया स्त्री कर्तृवाशी संबंधित आहेत. इयत्ता १ली ते १०वी च्या पाठयपुस्तकात आई–मुलगी, स्त्री कर्तृव व स्त्रीयांचे दुख या चारच विषयांवरील कवितेचा समावेश करण्यात आलेला असून स्त्रीयांच्या वास्तववादी विषयांकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

*निष्कर्ष :–*

इयत्ता १ली ते १०वी च्या पाठयपुस्तकांमध्ये स्त्रीविषयक कवितेचे प्रमाण अत्यल्प आहे. त्याच बरोबर कवयित्रींची संख्या कवींच्या तुलनेत खुपच कमी आहे. एकूण कवितांच्या प्रमाणात स्त्रीवादी कवितेचे प्रमाण कमी असून त्यामध्ये कवयित्रींनी लिहिलेल्या कवितांची संख्या सुध्दा अत्यल्प आहे. उलट कवींनी स्त्री संबंधी लिहिलेल्या कवितांची संख्या जास्त आहे. इयत्ता १ ली ते १०वी च्या पाठयपुस्तकांत आई, मुली, स्त्री कर्तृव व स्त्री दुःख चित्रण या चार स्त्रीविषयक विषयांतूनच कविता असून या कवितांमध्ये एकसूरीपणा जाणवतो.

इयत्ता १ ली ते १०वी च्या मराठी पाठयपुस्तकांमध्ये विदयार्थ्यांच्या वयोगटानुसार महिला सबलीकरणास पुरक असलेल्या कवितांना प्राध्यान्य देण्याची आवश्यकता आहे. त्याबरोबर स्त्रीयांच्या वास्तववादी कवितांचा आंतरभाव पाठयपुस्तकांत करणे आवश्यक आहे.

कवींनी व कवयित्रींनी लिहिलेल्या कवितांची निवड करून पाठयपुस्तकांत आंतरभाव करण्याऐवजी सर्वप्रथम स्त्री संबंधी ज्वलंत आशय निश्चित करण्यात यावा व आशया संबंधीत कविता असल्यास त्यांचा समावेश करण्यात यावा आणि त्या संदर्भातील कविता नसल्यास संबंधीत आशयावर कविता लेखनासाठी कवी कवयित्रींना प्रोत्साहीत करून कवी व कवयित्रींना या संदर्भात लिहिलेल्या कवीतांपैकी जी कविता आशयाच्या सर्वात जवळ असेल अशाच कवितेची निवड करावी. उदा. दुष्काळात होरपळणा–या महाराष्ट्रात खचून जावून पुरूष शेतकरी आत्महत्या करीत असून, आत्महत्या केलेल्या पुरूष शेतक–यांपेक्षांही बिकट परिस्थिती त्याच्या पत्नीची व कुटुंबाची असते. अशा विरोधी परिस्थितीत ती विधवा पत्नी त्या संकटाचा नेटाने सामना करून कुटूंबाचे पालन पोषण करते. आत्महत्या कधीच करत नाही. अशा शेकडो अपरिचित धिरोदांत्त स्त्रीयांवर कविता लेखन होणे आवश्यक असून त्यामाध्यमातून विदयार्थ्यांना प्रेरणा मिळून भविष्यातील परिस्थितीशी नेटाने सामना करून त्यावर यशस्वी मात करू शकेल. आणि कविता यासाठी उत्तम व्यासपीठ आहे. तसेच इयत्ता ८ वी ते १०वी च्या पाठयपुस्तकांमध्ये त्पहीज ज्व ठसममक, सॅनेटरी कप इत्यादी चळवळी विषयी विदयार्थ्यांमध्ये कवितेच्या माध्यमातून जाणीव जागृती करणे शक्य होईल.कवितेच्या माध्यमातून महिला सबलीकरणास बळ देण्याची क्षमता मराठी पाठयपुस्तकात असून मराठी पाठयपुस्तकांची पुनर्रचना करतांना हेतूपुरस्सर स्त्रीवादी कवितांना व त्यासंबधातील ज्वलंत विषयांना स्थान देण्यात यावे. जेणे करून स्त्रीवादी लेखन काव्य देशाच्या प्रगतीस हातभार लागेल.

***संदर्भ ग्रंथ सूची***

०१) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१४), मराठी बालभारती इयत्ता १ली
०२) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१४), मराठी बालभारती इयत्ता २री
०३) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१४), मराठी बालभारती इयत्ता ३री महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१४), मराठी बालभारती इयत्ता ४थी
०४) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१४),मराठी बालभारती इयत्ता ५वी
०५) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१४),मराठी बालभारती इयत्ता ६वी
०६) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१४),मराठी बालभारती इयत्ता ७वी
०७) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१४),मराठी बालभारती इयत्ता ८वी
०८) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१२),मराठी बालभारती इयत्ता ९वी
०९) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (२०१२),मराठी बालभारती इयत्ता १०वी
१०) एन.सी.एफ. (२००५)
११) एस.सी.एफ. (२०१२)

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org